**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
**SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY**
(Formerly University of Pune)

**समन्वय कक्ष (माध्यम)**
**गणेशखिंड, पुणे**

**Media Co-ordination Cell**
Ganeshkhind, Pune-7

२५ जानेवारी २०२०

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या माध्यम अभ्यास विभागाच्या माजी विद्यार्थ्यांचे दोन चित्रपट लवकरच प्रदर्शित होणार

- सोमवारी (२७ जानेवारी) सत्कार व वार्तालापाची संधी

पुणे -
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील 'माध्यम आणि संज्ञापन अभ्यास विभागा'चे माजी विद्यार्थी असलेल्या दोन दिग्दर्शकांचे चित्रपट येत्या दोन आठवड्यात प्रदर्शित होत आहेत. संदीप डी. दिग्दर्शित चित्रपट 'काळ' ३१ जानेवारी रोजी, तर ६५ व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार सोहळ्यात 'सर्वोत्कृष्ट बालचित्रपटा'चा पुरस्कार पटकावणारा अमर देवकर दिग्दर्शित 'म्होरक्या' हा चित्रपट ७ फेब्रुवारीला प्रदर्शित होणार आहे. त्यानिमित्त येत्या सोमवारी (२७ जानेवारी) विद्यापीठात त्यांचा सत्कार आयोजित करण्यात आला आहे.

विशेष म्हणजे या दोन्ही चित्रपटांच्या निर्मितीमागील बहुतेक कलाकारही 'डिपार्टमेंट ऑफ मीडिया अँड कम्युनिकेशन स्टडीज'चे (डीएमसीएस) विद्यार्थी आहेत. 'म्होरक्या'चे दिग्दर्शक अमर देवकर, छायाचित्रकार गिरीश जांभळीकर, संकलक निलेश रसाळ हे तिघे, आणि 'काळ'चे दिग्दर्शक संदीप डी., छायाचित्रकार दिग्विजय थोरात, सहदिग्दर्शक दत्ता बिडबाग, निर्माते रणजित ठाकूर हे एकेकाळी विभागाचे माजी विद्यार्थी आहेत.

विद्यापीठाच्या आवारातील 'डिपार्टमेंट ऑफ मीडिया अँड कम्युनिकेशन स्टडीज'मध्ये सोमवारी (२७ जानेवारी) सकाळी ११ वाजता कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांच्या हस्ते या विद्यार्थ्यांचा सत्कार केला जाणार आहे. यानंतर हे विद्यार्थी या दोन्ही चित्रपटांमागील निर्मितीची प्रक्रिया आणि इतर गोष्टींबाबत संवाद साधतील.

---

**अभिजित घोरपडे**
विशेष कार्याधिकारी, माध्यम समन्वय कक्ष
sppumediacell@gmail.com